mandal.com ■वर्ष २८ ■अंक १७२ ■शुक्रवार १४ जनवरी २०२२ ■पृष्ठ १२ ■४.०० ■संपादक: अनिल अग्रवाल
आरएनआय क्रमांक :- 59872/94
महाराष्ट्र का सबसे बड़ा व नंबर 1 शाम का अखबार

# अमरावती मंडल

email:amravatimandal11@gmail.com ■ Postal Regi. No.: AMT/RNP/ 370/2020-2022

# शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय में टीकाकरण शिविर

## शिक्षकों सहित छात्र-छात्राओं ने लिया लाभ

**प्रतिनिधि/ दि. १४**

**अमरावती** - स्थानीय श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय व श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय के संयुक्त तत्वावधान में गुरुवार को युवा स्वास्थ्य मिशन तथा जिलाधिकारी पवनीत कौर व्दारा ३ जनवरी को बुलाई गई सभा में दिए गए निर्देशो के अनुसार कार्यालय सहित संचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग के ७ जनवरी के पत्रानुसार महाविद्यालय के विद्यार्थियों के कोरोना टीकाकरण शिविर का आयोजन किया गया था. उच्च तंत्र शिक्षण विभाग शासन के आदेशानुसार राज्य के महाविद्यालयीन विद्यार्थियों का टीकाकरण किए जाने के उद्देश्य से महाविद्यालयों में टीकाकरण शिविर का आयोजन युवा स्वास्थ्य मिशन के नाम पर किए जाने का निर्णय लिया गया था.





उसी के अनुसार श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय की प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे व श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय के प्रचार्य डॉ. विनय राउत के नेतृत्व में टीकाकरण शिविर का आयोजन किया गया था. इस शिविर का महाविद्यालय की छात्र-छात्राओं ने लाभ लिया जिसमें क्षितिज मोहोड, मंथन राठौड, प्रणाली सवाईशाह, गौरव सगणे, रुपाली गायकवाड, अमृता सोलंके, सुचिता सोलंके, उन्नति वाघमारे, विकास दारशिंबे, संतोष धुर्वे, आरती दिकार, संजय पटेल, मो. उमेर आलम, पार्थ जोग, हर्षद बाभुलकर, संतोष सीताराम, शालिनी भोसले का समावेश था. उसी प्रकार शिक्षकों में प्रा. सुशांत कुकडे, महाविद्यालय में कार्यरत सफाई कामगार विनोद पासरे का भी समावेश रहा. टीकाकरण शिविर में कोविक्सीन का पहला व दूसरा डोज दिया गया. शिविर में जिला सामान्य अस्पताल की प्रीति मेश्राम, नलिनी मेश्राम, एस.एम. रामटेके तथा मनपा के शिक्षक एस.के. असलम, मो. फिरोज व्दारा योगदान दिया गया. टीकाकरण शिविर को सफल बनाने के लिए महाविद्यालय के सभी शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थियों ने अथक प्रयास किए.

मातृभूमि

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयात लसीकरण शिबिर

**प्रतिनिधी/ १४ जानेवारी**

**अमरावती :** स्थानिक श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय व श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमानाने 13 जाने. रोजी युवा स्वास्थ्य मिशन व जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार तसेच सहसंचालक उच्च शिक्षण यांच्या पत्रानुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता कोरोना प्रतिबंध लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले.



महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे व श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय राऊत यांच्या नेतृत्वात लसीकरणाची मोहीम सुरू करण्यात आली.शिबिराचा महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनी क्षितिज मोहोड, मंथन राठोड, कु. प्रणाली सवाईशहा, गौरव सगणे, कु. रूपाली गायकवाड, कु. अमृता सोळंके, कु. सुचिता सोळंके कु. उन्नती वाघमारे, विलास दारशिंबे, संतोष धुर्वे, कु. आरती दिकार, संजय पटेल, मोहम्मद उमेर आलम, पार्थ जोग, हर्षद बाभुळकर, संतोष सिताराम, शालिनी भोसले यांच्यासह शिक्षक प्रा. सुशांत कुकडे, सफाई कामगार विनोद पासरे यांनीही लाभ घेतला. कोविशिल्ड, को -व्हॅक्सिन लसीचा पहिला व दुसरा डोस उपलब्ध होता. लसीकरणाकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयातील स्टाफ प्रिती मेश्रा नलिनी मेश्राम, एस. एम रामटे तसेच महानगरपालिकेतील शिक्षक एस. के असलम, मोहम्मद फिरोज, जितेंद्र हर्षे, सागर बावणे यांच्याद्वारे लसीकरण करण्यात आले. लसीकरणाच्या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. चेतक शेंडे होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अथक परिश्रम घेतले.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेले मूल्याधिष्ठित शिक्षण




**डॉ. आंबेडकरांच्या मते शिक्षण ही शोषणमुक्तीची पायवाट. मूल्याधिष्ठित शिक्षणाविषयी प्रा. डॉ. संजय खडसे यांनी दिली माहिती**

प्रतिनिधी | अमरावती

''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' या तीन तत्त्वांत डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचे सार आहे. त्यांच्या दृष्टीने शिक्षण हीच शोषणमुक्तीची पायवाट होती. देशातील दलित व स्त्रियांवरील अन्यायाला रामबाण उपाय म्हणजे शिक्षणच असल्याची त्यांची खात्री होती. पालकांनी मुलांच्या शिक्षणासोबतच मुलींच्या शिक्षणासाठी धडपड केली तर समाजाची प्रगती झपाट्याने होईल, असे बाबासाहेब नेहमी म्हणत. हेच त्यांच्या शिक्षणविषयक विचारांचे वैशिष्ट्य होय. महामानवांना नवमानवतावादाचे संस्कार करणारे शिक्षण अपेक्षित होते. जात-धर्म-वर्ण यांना नष्ट करणाऱ्या विचारांची तसेच स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांवर आधारित शिक्षण विश्वरत्नांना अपेक्षित होते, असे मत श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात प्राध्यापक डॉ. संजय खडसे यांनी डॉ. आंबेडकर जयंतीच्या पूर्वसंध्येला व्यक्त केले.

ज्ञान म्हणजे प्रकाश. ही ज्ञानाची अतिसुंदर व्याख्या भगवान गौतम बुद्धांनी जनसमुदायासाठी केली होती. महात्मा ज्योतिराव फुले हे स्वतः अति क्षुद्र नसूनही त्यांनी क्षुद्र व अति क्षुद्र यातील भेद मिटवून दोन्ही सामाजिक वर्गांत सर्वप्रथम ऐक्य निर्माण केले. अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री दास्य विमोचन,स्त्री शिक्षण, अस्पृश्यांचे शिक्षण, सांस्कृतिक विषमतेचा अंत, आर्थिक शोषणमुक्ती, कामगार चळवळ, शेतकऱ्यांचा न्याय हक्क, बालविवाहाला विरोध, विधवा विवाहाला पाठिंबा, प्रगत शास्त्रीय शेतीचा पुरस्कार, बागायती शेतीचा आदर्श, दारुबंदी, समाज शिक्षण यात ज्योतिराव फुले यांचे कार्य म्हणजे ऐतिहासिक व सांस्कृतिक क्रांतीचा जाहीरनामाच होता. संत कबीर व महात्मा फुले यांना गुरू मानणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या महापुरुषांच्या स्वप्नांना अधिक क्रियाशील, अधिक धारदार व सक्षम बनवले.

अस्पृश्यता व जातीभेद हे भारतीय समाजाला झालेले कॅन्सर होते. फुले-शाहू-आंबेडकरी चळवळ ही या रोगावरील उपचार ठरली. हे तिन्ही महान पुरुष देशातील जातीभेद, अस्पृश्यता संपवणाऱ्या कृतीशील आंदोलनाचे क्रांती राखे आहेत, या चळवळीने देशातील शोषित व अस्पृश्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे कार्य केले.

विद्यार्थ्यांना ज्ञानाची आस असली पाहिजे असा उपदेश बाबासाहेब सदैव करायचे. ज्ञान ही प्रकाशा सोबतच शक्तीही असल्याने ती तलवारीसारखी असून तिचा वापर हा कल्पकतेने व समाजाच्या भल्यासाठी व्हायला हवा म्हणून ज्ञानाला चारित्र्याची ही जोड आवश्यक आहे. कोणतीही बाब सत्कारणी लावायची की तिचा दुरुपयोग करायचा याचा निर्णय कोणत्याही मनुष्याचे चारित्र्य करीत असते. मानवी सभ्यता व संस्कृतीचा पाया मजबूत करण्यासाठी ज्ञान व चारित्र्याचा मेळ आवश्यक असल्याचेही डॉ. आंबेडकरांनी वारंवार नमूद केल्याची माहितीही डॉ. खडसे यांनी दिली.

# श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय येथे कार्यशाळा संपन्न



**अमरावती दि. १८:** श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष- ॲड. जयवंत पाटील उर्फ भैयासाहेब पुजदेकर यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यशाळेत उद्‌घाटक व प्रमुख अतिथी म्हणून यवतमाळ स्थित शासकीय अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पाटिल उपस्थित होते. स गा. बा अमरावती विद्यापीठ चे पदव्युत्तर शिक्षण विभागाचे विभाग प्रमुख डॉ. गजानन गुल्हाने, व्यासपीठावर श्री शिवाजी कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. विनय राऊत, कार्यशाळेचे समन्वयक प्रा. डॉ. संजय खडसे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.गजानन गुल्हाने, डॉ. एस. टी. कोटवानी, प्राचार्य-सुनील कावळे, डॉ. अविनाश कोहळे, प्राचार्य ओमप्रकाश झिमटे, डॉ. गजानन शर्मा, डॉ. गोकुल डामरे, डॉ. नीलिमा अंबाडकर,डॉ.वनिता काळे,डॉ.किशोर क्षत्रिय, डॉ.अमित गावंडे, डॉ.संगीता बिहाडे, आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम अतिथींच्या हस्ते डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन- माल्यार्पण करण्यात आले.

विद्यापीठ गीताने या कार्यशाळेला सुरुवात झाली. या दरम्यान आयोजन वतीने सर्व अतिथी मान्यवरांचे शाल - श्रीफळ-पुष्पगुच्छ-वृक्ष रोपटे - व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासह भावी पिढी सर्वार्थाने स्वयंपूर्ण व्हावी तसेच कौशल्यधिष्ठित शिक्षणाची गरज लक्षात घेता , बदलत्या शैक्षणिक प्रारूपानुसार या कार्यशाळेच्या माध्यमातून सर्व अध्यापक महाविद्यालयीन प्राध्यापकांना पर्याप्त - परिपूर्ण माहिती लाभावी . याकरिता खासकरून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी अतिथी मान्यवरांचे वतीने या एकदिवसीय विभागीय कार्यशाळेला शुभेच्छा देण्यात आल्या. एकूण ३७ महाविद्यालयाचा समावेश होता. तसेच आगामी काळाची गरज लक्षात घेता, या कार्यशाळेला डॉ. गुल्हाने व डॉ.अमित गावंडे यांचे मार्गदर्शन लाभले.या कार्यशाळेच्या माध्यमातून अध्यापकांना नाविन्यपूर्ण शिक्षणाची नांदी- व भविष्यातील गवसणाऱ्या संधी लाभणार असल्याने ही कार्यशाळा जणू काही मैलाचा दगड ठरू पाहत आहे. या शब्दात अतिथींच्या वतीने सर्व उपस्थितांना समयोचित मार्गदर्शन करण्यात आले. तीन सत्रात झालेल्या या विभागीय कार्यशाळेला सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व आमंत्रित सदस्य यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. नाविन्यपूर्ण शिक्षण व परिवर्तनाच्या युगात या कार्यशाळेचे महत्व अधोरेखित करताना.

कार्यशाळेचे उद्‌घाटक-प्राचार्य -डॉ. सुहास पाटील व तसेच विभागिय कार्य शाळेचे समितीचे अध्यक्ष श्री शिवाजी कॉलेज ऑफ एज्युकेशन चे प्राचार्य-डॉ. विनय राऊत यांची महत्वपूर्ण भूमिका होती.

## श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात 'नोकरी आपल्या दारी'

# एकविसाव्या शतकात शिक्षकांची जबाबदारी महत्वाची : विलास मराठे





अमरावती दि. २६ : स्थानिक श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात आजी व माजी बी.एड. विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलच्या अंतर्गत सहाय्यक शिक्षकासाठी नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी हरिकिसन मालू आंतरराष्ट्रीय शाळा अमरावती व सुमन शिक्षण व संशोधन संस्था म्हसला बुलढाणा येथील देविदास घोरपडे आंतरराष्ट्रीय शाळेच्या अध्यक्षांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. याप्रसंगी दैनिक हिंदुस्थान चे प्रबंध संपादक श्री विलास मराठे हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विनय राऊत यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय शाळेचे अध्यक्ष डॉ.आशिष मालू, प्राचार्य श्री लोकेश माटे, देविदास आंतरराष्ट्रीय शाळेचे अध्यक्ष श्री अनिल घोरपडे, श्री सुहास आथे , श्री अमोल सावंग, महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्राचे आयक्यूएसी चे समन्वयक प्रा.डॉ.अमित गावंडे, प्लेसमेंट समितीच्या समन्वयक प्रा.डॉ.मीना रोकडे, प्रोफेसर डॉ.संजय खडसे ,प्रा. डॉ.वनिता काळे ,प्रा.डॉ.वंदना खाकरे, श्री सर्वेश मराठे आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात हिंदुस्थानचे संपादक श्री विलास मराठे म्हणाले की, एकविसाव्या शतकात शिक्षकांची जबाबदारी वाढलेली आहे. नवसमाज निर्मितीसाठी यापुढे शिक्षकांची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय निश्चितपणाने शिक्षकांना योग्य पद्धतीने तयार करीत असून महाविद्यालयाने गुणवत्तेच्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतलेली आहे. आपल्या भाषणात डॉ.आशिष मालू म्हणाले की, शिक्षकी पेशासाठी ज्ञानासह इमानदारी, प्रामाणिकता, शिस्त व कर्तव्यनिष्ठा महत्त्वाचे आहे. बी.एड. विद्यार्थ्यांनी या बाबी लक्षात घेतल्या तर ते आपल्या व्यवसायात यशस्वी होऊ शकतात.

यावेळी प्राचार्य डॉ.विनय राऊत यांचे समायोजित अध्यक्षीय भाषण झाले. प्लेसमेंट करिता महाविद्यालयातील २७ विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या. कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ. वनिता काळे यांनी तर आभार प्रदर्शन ग्रंथपाल डॉ.वंदना खाकरे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व बी.एड.चे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून विद्यार्थ्यांना विकसित करावे

## दिलीप इंगोले यांचे आवाहन, श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र



अमरावती, दि.२३ : नवीन शैक्षणिक धोरणातील बदलांमध्ये सर्व घटकांचा अभ्यास करून त्याची व्यवस्थित पणे विभागणी करावी लागेल. अभिमत विद्यापीठांची संकल्पना व रचना लक्षात घेऊन शिक्षकांनी या शैक्षणिक धोरणाचा विचार करून स्वतः ला व विद्यार्थ्यांना कसे विकसित करता येईल याचा विचार करावा ' असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपराव इंगोले यांनी केले. ते डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२३ व्या जयंती निमित्त संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : शिक्षक शिक्षणातील बदल या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात अध्यक्षपदावरून बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर शिक्षण विभागाचे विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. गजानन गुल्हाने होते. उद्‌घाटक म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव श्री शेषराव खाडे होते तर विचारपिठावर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. संजय खडसे, समन्वयक डॉ. वनिता काळे उपस्थित होते.

आपल्या भाषणात दिलीपराव इंगोले पुढे म्हणाले की, डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शिक्षणाची कवाडे येथील थोर मोठ्यांसाठी उघडी करून दिली , त्यांचे कार्य आपल्याला पुढे न्यायचे आहे , जे शैक्षणिक धोरण यापूर्वीच्या शिक्षणतज्ञांनी सांगितलेली आहेत त्यात आवश्यकतेनुसार बदल करून ती आपल्या पर्यंत आलेली आहेत. बदलत्या शैक्षणिक धोरणाचा उपयोग करून प्रत्येक जनसामान्यांपर्यंत नेण्याची गरज असल्याचे यावेळी श्री दिलीप इंगोले म्हणाले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची माहिती सर्व शैक्षणिक संस्थांमार्फत प्राध्यापक , संशोधक , शिक्षक व विद्यार्थ्यांपर्यंत हा उद्देश ठेवलेला होता त्यास अनुसरून श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयाने या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. आपल्या उद्घाटनप्रसंगी भाषणात शेषराव खाडे म्हणाले की, शिक्षकांनी स्वतः ला अपडेट ठेवले पाहिजे , आपल्या जबाबदा-यांचे वहन करतांना आपली नेमकी भूमिका कोणती याचेही भान शिक्षकाला ठेवायचे आहे, असे ते म्हणाले.

राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रात शिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग , संशोधक, शिक्षक असे ११० प्रतिनिधी सहभागी झाले होते. एक दिवसीय चर्चासत्रात प्रथम सत्रात डॉ गजानन गुल्हाने यांनी ' राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: शिक्षक व शिक्षण ' या विषयावर आपले अभ्यासपूर्ण व्याख्यान केले. बदलत्या आव्हानांना सामोरे जाताना येणाऱ्या बदलास सुयोग्य नियोजनाने कसे सामोरे जावे याचा उदाहरणांसह उहापोह केला. तर द्वितीय सत्रात हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एक. बी. मराठे ' राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व व्यावसायिक शिक्षण ' या विषयावर बोलताना परंपरागत कौशल्याचा शिक्षणात उपयोग करून युवकांना सक्षम बनविण्याचे धोरण या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात असल्याचे ते म्हणाले.

यावेळी उपस्थित प्राध्यापक प्रतिनिधींनी दोन्ही वक्त्यांना विविध प्रश्न विचारून निरसन करून घेतले. यावेळी प्राचार्य डॉ. सुजाता तायडे व डॉ. पवार यांनी आपले यथोचित मनोगत व्यक्त करून सात दिवसीय चर्चासत्र आयोजित करावे असा विचार मांडला. कार्यक्रमाचा समारोप संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रोफेसर डॉ.प्रफुल्ल गवई यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय खडसे होते तर विचारपिठावर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गजानन गुल्हाने , प्राचार्य डॉ. एक.बी. मराठे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन समन्वयक डॉ. वनिता काळे यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. किशोर क्षत्रिय यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी महाविद्यालयाच्या डॉ. मीना रोकडे , डॉ. संगीता बिहाडे , डॉ. अमित गावंडे , डॉ. कविता वाटाणे, डॉ. वंदना खाकरे यांचेसह बी.एड विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्राला प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे, प्राचार्य डॉ. सुरेश गाडे , प्राचार्य डॉ. संजय शेजव , प्राचार्य डॉ. सुजाता तायडे, प्राचार्य डॉ. गजानन शर्मा, प्राचार्य डॉ.शेंडे, प्राचार्य डॉ. राजेश खंडारे, डॉ. पुष्पलता देशमुख, डॉ. सायर, डॉ. चेतक शेंडे आदिसह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बदलता आकृतीबंधावर मतप्रदर्शन**

कार्यक्रमादम्यान प्रास्ताविकात बोलतांना प्राचार्य डॉ. संजय खडसे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० , शिक्षक शिक्षणातील बदल त्याची आवश्यकता, गुणवत्तापूर्ण , कौशल्यपूर्ण विकासासाठी शैक्षणिक बदल शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणाचा बदलता आकृतीबंध यावर आपले मत प्रतिपादित केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. गजानन गुल्हाने यांनी नवीन शैक्षणिक धोरणातील बदलांमुळे होणारा भविष्यात बदल व त्याची घ्यावयाची काळजी यावर विचार व्यक्त केले.

# राजर्षी शाहू महाविद्यालयाने गाजविली युवा संसद

## युवक बिरादरी आणि शिवाजी शिक्षण संस्थेचे आयोजन

## विभागीय फेरीत पटकावले प्रथम पारितोषिक



**अमरावती (प्रतिनिधी):** युवक बिरादरी आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभिरूप युवा संसदेच्या राज्यस्तरीय स्पर्धेच्या विभागीय फेरीत चांदूर रेल्वे येथील राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालयाच्या टीमने युवा संसदेच्या कामकाजाचे उत्कृष्ट प्रदर्शन करीत प्रथम पारितोषिक पटकावले आहे. दहा हजार रोख तसेच प्रमाणपत्र देऊन या टिमचा गौरव मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आला.

श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात आयोजित अभिरूप युवा संसद विभागीय स्पर्धेत विभागातील पाचही जिल्ह्यांमधून तब्बल सहा टीम सहभागी झाल्या होत्या. प्रत्येक टिमने तासभर अभिरूप संसदेचे सादरीकरण केले. यामध्ये सभागृहात नव्या मंत्र्यांची शपथ, श्रद्धांजली, प्रश्नोत्तरे, विधेयके, वादविवाद, सभात्याग अशा संसदेतील निगडीत विविधांगी बाबींचे प्रदर्शन विद्यार्थ्यांनी यावेळी घडविले. या स्पर्धेचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले यांनी केले. यावेळी संस्थेचे सचिव शेषराव खाडे, शिक्षण विभागाचे उपव्यवस्थापक पंडित पंडागळे, प्राचार्य डॉ.संजय खडसे, युवक बिरादरीचे संचालक तथा स्पर्धेचे संयोजक गौरव इंगळे, प्रा. अमित गावंडे, युवक बिरादरीचे शहराध्यक्ष प्रदीप चौधरी आदींची यावेळी उपस्थिती होती.

या स्पर्धेत अमरावती येथील श्री कला व वाणिज्य महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथील राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, कारंजा लाड येथील श्री एस.एस.एस.के.आर. इन्नानी महाविद्यालय (द्वितीय पारितोषिक), चिखली येथील श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट येथील श्री श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (तृतीय पारितोषिक) तसेच यवतमाळ येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयाच्या चमूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेसाठी जिल्हा पातळीवर विविध महाविद्यालयांना अभिरूप युवा संसदेचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या सहभागासाठी सादरीकरणाचे व्हिडिओज मागविण्यात आले होते. त्यामधून निवड झालेल्या महाविद्यालयांनी विभागीय स्पर्धेत सहभाग घेतला होता.

स्पर्धा पार पाडल्यानंतर बक्षिस वितरण समारंभाला अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दिलीप काळे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण संस्था चालक संघटनेच्या अध्यक्ष कांचनमाला गावंडे, स्पर्धेचे परीक्षक तथा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विभागीय समन्वयक डॉ.अंबादास मोहिते, प्रा.शरद भावे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या शिक्षण विभागाचे उपव्यवस्थापक पंडित पंडागळे, युवक बिरादरी (भारत) चे संचालक गौरव इंगळे, शहराध्यक्ष प्रदीप चौधरी, प्राचार्य डॉ.संजय खडसे, प्रा. अमित गावंडे, प्रशांत वाघाये यांची यावेळी उपस्थिती होती.



### दोन प्रकारच्या संसदेचा अभ्यास करावा – देशमुख

देश स्वतंत्र झाल्यापासून देशात अस्तित्वात आलेल्या संसदेपासून आज अस्तित्वात असलेल्या संसदेपैकी कुठल्या संसदेच्या कामकाजाविषयी समाधानी आपण आहोत याचा अभ्यास आजच्या तरुण पिढीने करावा. देशात प्रत्येकाचे न्याय, हक्क अबाधित राखत त्यांच्या कल्याणाचा विचार करणारी संसद असून आजच्या काळात तिचा चेहरामोहरा बदलला का व ते कसे व कोणामुळे झाले ? यावर अभ्यास करून भविष्यात संसदेवर आपला प्रतिनिधी पाठवित असताना योग्य विचारधारा आणि देशाच्या विकासाची दिशा असलेल्यांनाच आपण मतदान करावे असे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी अभिरूप युवा संसदेच्या बक्षीस वितरण समारंभावेळी केले. देशाचे भविष्य तरुण पिढीच्या हाती असून तरुण पिढीने संसदीय प्रणाली समजून घेतली हेच चांगल्या भविष्याचे द्योतक असल्याचेही देशमुख यावेळी म्हणाले.

### विधानभवनातील संसदेसाठी चार जणांची निवड

विभागीय फेरीत उत्कृष्ट प्रदर्शन केलेल्या चार युवा संसदपटूंची निवड राज्य पातळीवरील अभिरूप युवा संसदेसाठी करण्यात आली आहे. जानेवारी महिन्यात महाराष्ट्र विधान भवन येथे ही अभिरूप युवा संसद आयोजित असून त्यासाठी अमिन मिरजकर, साक्षी गिलोरकर, कमलेश कुशवाहा आणि अक्षय वानखेडे (अकोट) यांची निवड करण्यात आली आहे. तसेच यावेळी सभापती म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या साक्षी पानतावणे हिचा देखील गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला आहे.

जनमाध्यम अमरावती,शुक्रवार, १७ डिसेंबर, २०२१ E-paper - www.ja

# राजर्षी शाहू महाविद्यालयाने गाजवली युवा संसद

## युवक बिरादरी आणि शिवाजी शिक्षण संस्थेचे आयोजन, विभागीय फेरीत पटकावले प्रथम पारितोषिक

**अमरावती/का.प्र.**

युवक बिरादरी आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभिरूप युवा संसदेच्या राज्यस्तरीय स्पर्धेच्या विभागीय फेरीत चांदूर रेल्वे येथील राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालयाच्या टीमने युवा संसदेच्या कामकाजाचे उत्कृष्ट प्रदर्शन करित प्रथम पारितोषिक पटकावले आहे. दहा हजार रोख तसेच प्रमाणपत्र देऊन या टिमचा गौरव मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आला.

श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात आयोजित अभिरूप युवा संसद विभागीय स्पर्धेत विभागातील पाचही जिल्ह्यांमधून तब्बल सहा टीम सहभागी झाल्या होत्या. प्रत्येक टिमने तासभर अभिरूप संसदेचे सादरीकरण केले. यामध्ये सभागृहात नव्या मंत्र्यांची शपथ, श्रद्धांजली, प्रश्नोत्तरे, विधेयके, वादविवाद, सभात्याग अशा संसदेशी निगडीत विविधांगी बाबींचे प्रदर्शन विद्यार्थ्यांनी यावेळी घडविले. या स्पर्धेचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले यांनी केले. यावेळी संस्थेचे सचिव शेषराव खाडे, शिक्षण विभागाचे उपव्यवस्थापक पंडित पंडागळे, प्राचार्य डॉ.संजय खडसे, युवक बिरादरीचे संचालक तथा स्पर्धेचे संयोजक गौरव इंगळे, प्रा. अमित गावंडे, युवक बिरादरीचे शहराध्यक्ष प्रदीप चौधरी आदींची यावेळी उपस्थिती होती. या स्पर्धेत अमरावती येथील श्री कला व वाणिज्य महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथील राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, कारंजा लाड येथील श्री एस.एस.एस.के.आर. इन्नानी महाविद्यालय (द्वितीय पारितोषिक), चिखली येथील श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट येथील श्री श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (तृतीय पारितोषिक) तसेच



यवतमाळ येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयाच्या चमुंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेसाठी जिल्हा पातळीवर विविध महाविद्यालयांना अभिरूप युवा संसदेचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या सहभागासाठी सादरीकरणाचे व्हिडिओज मागविण्यात आले होते. त्यामधून निवड झालेल्या महाविद्यालयांनी विभागीय स्पर्धेत सहभाग घेतला होता.

स्पर्धा पार पाडल्यानंतर बक्षिस वितरण समारंभाला अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दिलीप काळे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण संस्था चालक संघटनेच्या अध्यक्ष कांचनमाला गावंडे, स्पर्धेचे परीक्षक तथा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विभागीय समन्वयक डॉ.अंबादास मोहिते, प्रा.शरद भावे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या शिक्षण विभागाचे उपव्यवस्थापक पंडित पंडागळे, युवक बिरादरी (भारत) चे संचालक गौरव इंगळे, शहराध्यक्ष प्रदीप चौधरी, प्राचार्य डॉ.संजय खडसे, प्रा. अमित गावंडे, प्रशांत वाघाये यांची यावेळी उपस्थिती होती.

### दोन प्रकारच्या संसदेचा अभ्यास करावा - देशमुख

देश स्वतंत्र झाल्यापासून देशात अस्तित्वात आलेल्या संसदेपासून आज अस्तित्वात असलेल्या संसदेपैकी कुठल्या संसदेच्या कामकाजाविषयी समाधानी आपण आहोत याचा अभ्यास आजच्या तरूण पिढीने करावा. देशात प्रत्येकाचे न्याय, हक्क अबाधित राखत त्यांच्या कल्याणाचा विचार करणारी संसद असून आजच्या काळात तिचा चेहरामोहरा बदलला का व ते कसे व कोणामुळे झाले ? यावर अभ्यास करून भविष्यात संसदेवर आपला प्रतिनिधी पाठवित असताना योग्य विचारधारा आणि देशाच्या विकासाची दिशा असलेल्यांनाच आपण मतदान करावे असे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी अभिरूप युवा संसदेच्या बक्षिस वितरण समारंभावेळी केले. देशाचे भविष्य तरूण पिढीच्या हाती असून तरूण पिढीने संसदीय प्रणाली समजून घेतली हेच चांगल्या भविष्याचे द्योतक असल्याचेही देशमुख म्हणाले.

### विधानभवनातील संसदेसाठी चार जणांची निवड

विभागीय फेरीत उत्कृष्ट प्रदर्शन केलेल्या चार युवा संसदपटूंची निवड राज्य पातळीवरील अभिरूप युवा संसदेसाठी करण्यात आली आहे. जानेवारी महिन्यात महाराष्ट्र विधान भवन येथे ही अभिरूप युवा संसद आयोजित असून त्यासाठी अमिन मिरजकर, साक्षी गिलोरकर, कमलेश कुशवाहा आणि अक्षय वानखेडे (अकोट) यांची निवड करण्यात आली आहे. तसेच यावेळी सभापती म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या साक्षी पानतावणे हिचा देखील गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला आहे.

देशोन्नती

माझं शहर

# राजर्षी शाहू महाविद्यालयाने गाजवली 'युवा संसद'

## ■ युवक बिरादरी आणि शिवाजी शिक्षण संस्थेचे आयोजन ■ विभागीय फेरीत पटकावले 'प्रथम' पारितोषिक



देशोन्नती वृत्तसंकलन...

**अमरावती** ■ युवक बिरादरी आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभिरूप युवा संसदेच्या राज्यस्तरीय स्पर्धेच्या विभागीय फेरीत चांदूर रेल्वे येथील राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालयाच्या टीमने युवा संसदेच्या कामकाजाचे उत्कृष्ट प्रदर्शन करित प्रथम पारितोषिक पटकावले आहे. दहा हजार रोख तसेच प्रमाणपत्र देऊन या टिमचा गौरव मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आला.

श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात आयोजित अभिरूप युवा संसद विभागीय स्पर्धेत विभागातील पाचही जिल्ह्यांमधून तब्बल सहा टीम सहभागी झाल्या होत्या. प्रत्येक टिमने तासभर अभिरूप संसदेचे सादरीकरण केले. यामध्ये सभागृहात नव्या मंत्र्यांची शपथ, श्रद्धांजली, प्रश्नोत्तरे, विधेयके, वादविवाद, सभात्याग अशा संसदेशी निगडीत विविधांगी बाबींचे प्रदर्शन विद्यार्थ्यांनी यावेळी घडविले. या स्पर्धेचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले यांनी केले. यावेळी संस्थेचे सचिव शेषराव खाडे, शिक्षण विभागाचे उपव्यवस्थापक पंडित पंडागळे, प्राचार्य डॉ.संजय खडसे, युवक बिरादरीचे संचालक तथा स्पर्धेचे संयोजक गौरव इंगळे, प्रा. अमित गावंडे, युवक बिरादरीचे शहराध्यक्ष प्रदीप चौधरी आदींची यावेळी उपस्थिती होती. या स्पर्धेत अमरावती येथील श्री कला व वाणिज्य महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथील राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, कारंजा लाड येथील श्री एस.एस.एस.के.आर. इन्नानी महाविद्यालय (द्वितीय पारितोषिक), चिखली येथील श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट येथील श्री श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (तृतीय पारितोषिक) तसेच यवतमाळ येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयाच्या चमुंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेसाठी जिल्हा पातळीवर विविध महाविद्यालयांना अभिरूप युवा संसदेचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या सहभागासाठी सादरीकरणाचे व्हिडिओज मागविण्यात आले होते. त्यामधून निवड झालेल्या महाविद्यालयांनी विभागीय स्पर्धेत सहभाग घेतला होता.

स्पर्धा पार पाडल्यानंतर बक्षिस वितरण समारंभाला अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दिलीप काळे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण संस्था चालक संघटनेच्या अध्यक्ष कांचनमाला गावंडे, स्पर्धेचे परीक्षक तथा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विभागीय समन्वयक डॉ.अंबादास मोहिते, प्रा.शरद भावे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या शिक्षण विभागाचे उपव्यवस्थापक पंडित पंडागळे, युवक बिरादरी (भारत) चे संचालक गौरव इंगळे, शहराध्यक्ष प्रदीप चौधरी, प्राचार्य डॉ.संजय खडसे, प्रा. अमित गावंडे, प्रशांत बाघाये यांची यावेळी उपस्थिती होती.

### दोन प्रकारच्या संसदेचा अभ्यास करावा - हर्षवर्धन देशमुख



देश स्वतंत्र झाल्यापासून देशात अस्तित्वात आलेल्या संसदेपासून आज अस्तित्वात असलेल्या संसदेपैकी कुठल्या संसदेच्या कामकाजाविषयी समाधानी आपण आहोत याचा अभ्यास आजच्या तरूण पिढीने करावा. देशात प्रत्येकाचे न्याय, हक्क अबाधित राखत त्यांच्या कल्याणाचा विचार करणारी संसद असून आजच्या काळात तिचा चेहरामोहरा बदलला का व ते कसे व कोणामुळे झाले ? यावर अभ्यास करून भविष्यात संसदेवर आपला प्रतिनिधी पाठवित असताना योग्य विचारधारा आणि देशाच्या विकासाची दिशा असलेल्यांनाच आपण मतदान करावे असे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी अभिरूप युवा संसदेच्या बक्षिस वितरण समारंभावेळी केले. देशाचे भविष्य तरूण पिढीच्या हाती असून तरूण पिढीने संसदीय प्रणाली समजून घेतली हेच चांगल्या भविष्याचे द्योतक असल्याचेही देशमुख यावेळी म्हणाले.

तरुण भारत
Amravati | 2022-02-08 | Page- 1
epaper.tarunbharat.net

# मतदाराने प्रामाणिकास प्राधान्यक्रम द्यावा

## डॉ. एकनाथ तट्टे यांचे आवाहन

## शिवाजी शिक्षण महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन

◆ **अमरावती, ७ फेब्रुवारी**

श्रीमंत देशाचा पाया माणूसकी व प्रामाणिकपणावर उभारलेला असतो, हे राजकीय तत्त्वज्ञान भारतीय राजकारणाने स्वीकारल्यास व त्यानुसार येथील प्रत्येक मतदाराने माणूसकी व प्रामाणिक उमेदवारांची निवड केल्यास भारतीय लोकशाहीची मूल्ये अधिक बळकट होतील , खऱ्या अर्थाने भारताच्या विकासाचे टप्पे आपण अधिक जलद गतीने गाठू शकू, असा विश्वास बी. एस. पाटील महाविद्यालय परतवाडा येथील इंग्रजीचे प्राध्यापक तथा सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. एकनाथ तट्टे यांनी व्यक्त केला. ते स्थानिक श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात ऑनलाइन पद्धतीने आयोजित राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय राऊत हे उपस्थित होते.

आपल्या ओजस्वी भाषणात डॉ. एकनाथ तट्टे पुढे म्हणाले की , 'प्लेटो, सॉक्रेटिस, स्वामी विवेकानंद या विचारवंतांनी देखील राजकीय तत्त्वज्ञान मांडतांना प्रामाणिकतेवर भर दिलेला आहे. साम-दाम-दंड-भेद याला तरुण वर्ग बळी पडतो. निकोप राजकारणासाठी शासकीय यंत्रणा या बाबतीत प्रयत्नपूर्वक काम करतात; परंतु विविध राजकीय पक्ष यास मुठमाती देतात. जातीपातीत आपण गुरफटलेलो आहोत. मतदारांना भुरळ पाडण्यासाठी राजकीय पक्ष वेगवेगळ्या योजना राबवतात. आमिषं दिली जातात, जातीयवादाची भूमिका टोकाला पोहोचवून आपलं साध्य पूर्णत्वाला नेतात. जातीच्या पल्याड वेगळा विचार आहे तो म्हणजे मानवता. हा विचार तरुणांनी लक्षात घेतला पाहिजे असेही डॉ. एकनाथ तट्टे परखडपणे बोललेत.

आपल्या प्रास्ताविक भाषणात कार्यक्रमाचे प्रभारी प्रोफेसर डॉ. संजय खडसे म्हणाले की , राष्ट्रीय मतदार दिन २०११ पासून संपूर्ण देशभरात साजरा केला जातो. भारतातील मतदार सुजाण व जबाबदार नागरिक घडविण्यासाठी तसेच लोकशाहीची मूल्य अधिक बळकट करण्यासाठी नवतरुणांनी निःपक्षपातीपणे योग्य उमेदवार निवडून देशाच्या विकासाकडे अधिक लक्ष द्यावे. जातीच्या राजकारणापासून अलिप्त रहावे असे आवाहनही त्यांनी केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.विनय राऊत म्हणाले की , अनेक राजकीय पक्षांची अनेक मतमतांतरे असली तरी विद्यार्थी नवयुवक मतदारांनी आपली सद्सद्विवेकबुद्धी वापरून योग्य व सक्षम उमेदवाराची निवड करावी. यावेळी उपस्थित सर्व सहभागींना कार्यक्रमाचे समन्वयक प्रोफेसर डॉ. संजय खडसे यांनी राष्ट्रीय मतदार शपथ दिली.

ऑनलाइन कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. मीना रोकडे , डॉ. वनिता काळे, डॉ. किशोर क्षत्रिय, डॉ. संगीता बिहाडे, डॉ. अमित गावंडे, ग्रंथपाल डॉ. वंदना खाकरे, तेजस ठाकरे यांचेसह पीएचडी संशोधन केंद्राचे विद्यार्थी, मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी, बीएडचे विद्यार्थी माजी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. ऑनलाइन कार्यक्रमाचे संचालन प्रोफेसर डॉ. संजय खडसे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. किशोर क्षत्रिय यांनी केले.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

# मतदारांनी प्रामाणिक व माणुसकी असणाऱ्यास प्राधान्यक्रम द्यावा– प्रा. डॉ. एकनाथ तट्टे

## श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात राष्ट्रीय मतदारदिन साजरा

**अमरावती ( प्रतिनिधी ):** श्रीमंत देशाचा पाया माणुसकी व प्रामाणिकपणावर उभारलेला असतो. हे राजकीय तत्त्वज्ञान भारतीय राजकारणाने स्वीकारल्यास व त्यानुसार येथील प्रत्येक मतदाराने माणुसकी व प्रामाणिक उमेदवारांची निवड केल्यास भारतीय लोकशाहीची मूल्य अधिक बळकट होतील. खऱ्या अर्थाने भारताच्या विकासाची टप्पे आपण अधिक जलद गतीने गाठू शकू असा विश्वास बी. एस. पाटील महाविद्यालय परतवाडा येथील इंग्रजीचे प्राध्यापक तथा साहित्यिक डॉ.एकनाथ तट्टे यांनी व्यक्त केला. ते स्थानिक श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात ऑनलाइन पद्धतीने आयोजित राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य



डॉ. विनय राऊत हे उपस्थित होते.

डॉ. एकनाथ तट्टे यांनी अध्यक्षीय भाषणात 'प्लेटो, सॉक्रेटिस, स्वामी विवेकानंद या विचारवंतांनी देखील राजकीय तत्त्वज्ञान मांडतांना प्रामाणिकतेवर भर दिलेला आहे. या विचारवंतांनी देखील राजकीय तत्त्वज्ञान मांडतांना प्रामाणिकतेवर भर दिलेला आहे. प्रास्ताविक भाषणात कार्यक्रमाचे प्रभारी प्रोफेसर डॉ संजय खडसे म्हणाले की, राष्ट्रीय मतदार दिन २०११ पासून संपूर्ण देशभरात साजरा केला जात असून नवतरुण यांनी नि:पक्षपातीपणे योग्य उमेदवार निवडून देशाच्या विकासाकडे अधिक लक्ष द्यावे. जातीच्या राजकारणापासून अलिप्त रहावे असे आवाहनही त्यांनी केले. प्राचार्य डॉ.विनय राऊत यांनी अनेक राजकीय पक्षांची अनेक मतमतांतरे असली तरी विद्यार्थी नवयुवक मतदारांनी आपली सद्सद्विवेकबुद्धी वापरून योग्य व सक्षम उमेदवाराची निवड करावी तसेच तरुण मतदारांनी मोठ्या प्रमाणात निवडणूक उत्साहात सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थित सर्व सहभागींना कार्यक्रमाचे समन्वयक प्रोफेसर डॉ. संजय खडसे यांनी सर्वांना राष्ट्रीय मतदार शपथ दिली.

ऑनलाइन कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. मीना रोकडे, डॉ. वनिता काळे, डॉ. किशोर क्षत्रिय, डॉ.संगीता बिहाडे, डॉ.अमित गावंडे, ग्रंथपाल डॉ. वंदना खाकरे, तेजस ठाकरे यांचेसह पीएचडी संशोधन केंद्राचे विद्यार्थी, मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी, बीएडचे विद्यार्थी माजी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. ऑनलाइन कार्यक्रमाचे संचालन प्रोफेसर डॉ.संजय खडसे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. किशोर क्षत्रिय यांनी केले.

मातृभूमी



# युवकांनी शिवाजी महाराजांचा आदर्श जोपासावा

## शिवाजी शिक्षण महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



**प्रतिनिधी/२० फेब्रुवारी**

**अमरावती-** ३३६ वर्षांची मुस्लिम राज्यकर्त्यांची कारकींद छत्रपती शिवाजी महाराजांनी उलथवून ख-या अर्थाने रयतेचे राज्य महाराष्ट्रात निर्माण केले. निजामशाही, आदिलशाही, मोगलशाहीचा नायनाट करुन राज्यात इ.स. १६४५ साली वयाच्या १५ व्या वर्षी तोरणा किल्ला जिंकून युवकांपुढे नवा आदर्श निर्माण केला. माँ जिजाऊ साहेबांच्या तालमित तयार झालेले छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती धर्मात्या मावळ्यांची फौज तयार करून देशात सर्वधर्मसमभावाची मुहूर्तमेढ रोवली. वाघ नखाचा उपयोग करुन अफजलखानाचा कोथळा बाहेर काढणा-या छत्रपती शिवाजी महाराजांनी मुस्लिमवृत्ती नष्ट केली.

### सचिव शेषराव खाडे यांचे प्रतिपादन

सद्यपरिस्थितीत महापुरुषांच्या नावांवर जे राजकारण होत आहे, त्यामुळे सर्वसामान्य माणूस तणावात जगत आहे. युवकांनी वाचन संस्कृती जोपासून खरा इतिहास लोकांपुढे मांडावा अन छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श जोपासावा. असे उद्गार श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव शेषराव खाडे यांनी केले. स्थानिक श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९२ व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

